
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय
दा. क्र.
IRBK-0107712
IRBK-0107712

৬৩৯২



# अंगत पंगत

राजा मंगळवेढेकर

म. ग्रं. सं. ठाणे

IRBK-0107712



# गंमत जंमत

राजा मंगळवेढेकर

व्हीनस प्रकाशन : पुणें

किंमत ७५ नये पैसे

आवृत्ति पहिली

◎ ◎

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

◎ ◎

चित्रकार :
**वि, स. पाथरकर**

◎ ◎

प्रकाशक :
**स. कृ. पाध्ये**
व्हीनस प्रकाशन
४१० शनवार पेठ : पुणें २

◎

मुद्रक :
**ह. म. गद्रे**
जनवाणी प्रिंटिंग प्रेस
४५ बुधवार : पुणें २



# लटपटराव आणि खटपटराव

एक होते लटपटराव
दुसरे होते खटपटराव




लटपटरावची नुसती लटपट
कामापेक्षां जास्ती वटवट

खटपटरावची नुसती खटपट
कामापेक्षां जास्ती खटखट


दोघांनी केला एक बेत
घ्यायचें ठरवलें एक शेत

एक म्हणतो, 'पेरूं गहूं'
दुसरा म्हणतो, 'पोळी मऊ'




एक म्हणतो, 'पेरूं भात'
दुसरा म्हणतो, 'मारूं हात'





एक म्हणतो, 'विहीर खणूं'
दुसरा म्हणतो, 'बैल आणूं'



एक म्हणतो, 'जुंपूं गाडी'
दुसरा म्हणतो, 'बांधूं माडी'

गाडी–माडी कोणाची ?
दोघे म्हणती स्वतःची !




दोघांत जुंपतें मोठें भांडण
बाजारच्या तुरींचें होतें कांडण!




# मी कोण होणार?

आई ग आई !  
होणार कोण तें

विचारतेस मला  
सांगतों तुला !  
होईन मी हत्ती  
मिळवीन शक्ति  
कोल्होबासारखी लढवीन युक्ति !



होईन मी हरीण  
चपळाई करीन  
मोत्यासारखा इमानी राहीन !



होईन मी ससा
गुबगुबीत असा
वाघोबासारखा
गुरकावीन तसा !





होईन मी चिमणा
जमविन दाणा
मिठ्ठूसारखा
होईन शहाणा !

आई ग आई ! विचारतेस मला
होणार कोण तें सांगितलें तुला !





# माझा बगीचा

सुंदर माझा बगीचा खास
पहा दावितों मी तुम्हांस

शेवंतीचा पिवळा रंग
गुलाबाचें कोमल अंग

नाजुक इकडे जाई-जुई
उडें कारंजें थुई थुई


पारिजातक घाली सडा
गुल्मोहराचा लाल विडा

निशिगंधाचा देखा कर्णा
रानफुलांचा किती हा भरणा !

बकूळ फुलली आहे छान
चांफा म्हणजे सुंदर खाण


रातराणीचा डौल पहा
गंध कसा हा छान अहा!

कमानीवरी बोगनवेल
कळ्या फुलांची रेलचेल







गडगड गडगड गडगडतें
म्हातारी आभाळांत पीठ दळतें !

सूं सूं सूं सूं येतो वारा
म्हातारी पळते सैरा वैरा !

टप् टप् टप् टप् पडती धारा
म्हातारी शोधी कुठें निवारा !

सप् सप् सप् सप् पडती गारा
म्हातारीला मिळत नाहीं थारा !






लव् लव् लव् लव् लवली वीज
म्हातारीला आली आहे नीज !

रप् रप् रप् रप् झाला चिखल
म्हातारी धांवे घेऊन मुसळ !



# गंमतीची उजळणी

28343
विभाग
क्रमांक
नों. दि
वाचनालय




एक – दोन तिकडे कोण?

तीन–चार व्हा तय्यार!

पांच–सहा चोर पहा!

सात–आठ धरा पाठ

नऊ – दहा पकडला पहा!

28393
नों. दि 23/3/60


अकरा – बारा
हाणा मारा

तेरा – चौदा
सोडा सोडा

पंधरा – सोळा
ठेवा डोळा

सतरा – अठरा
आवरा आवरा

एकोणीस–वीस
आले पोलिस





चौरास दंड    खेळ बंद!



# वाहनाची मजा


भक् भक् करते एंजिन गाडी
पहा धुराची काळी दाढी
मागें मागें डबे धांवती
नव्या नव्या गांवाला जाती !







टप् टप् टप् टप् टांगा घोडा
आला, आला रस्ता सोडा
घोडा काळा चपळही फार
टांगेवाला बडा हुशार !

रों रों रों रों करी विमान
पहा करूनी कलती मान
पंख दोन ते किति तरि छान
ढगांत हिंडे दावित शान !




खड् खड् खड् खड् गाडी करते
बैल ओढती मळ्यास जाते
वाजति घुंगरू रुम् झुम् झुम्
चाकं कारितसें कुरुम् कुरुम् !





ऐका ऐका झाला भोंगा
बोट चालली टाकित ढांगा
पाण्यावरती होउनि स्वार
सुरकन् झाली पहा पसार !

पों पों पों पों मोटर आली
भरकन् येऊन निघून गेली
डौल तिचा राणीचा फार
मजेमजेचे रंग आकार !




अशीं वाहनें मज्जेशीर बसून फिरावें गंमतशीर !




# मनुताई!

मनुताई, मनुताई, अशाकशा
गोऱ्या गोऱ्या गालांवर लांब लांब मिशा!

अंग कसें हें पांढरेंफेक्
चुलीच्या शेजारीं घेतां शेक
डोळे मिटुनी गुरगुर चाले,
आजोबावाणी घोरतां जशा!






जरा वाजतां कुठेंहि खट्ट्
कान तिखट हो उंच नि तट्ट्
खुडखुडणारा उंदिरमामा,
मटकावुन ये सुस्त नशा!

घरांत येतां परका बोका
शेपटीचा पिस्करुन झुबका
हल्ला करुनी पसार करतां,

रणामधूनी शत्रु जसा!





दुभत्या जवळीं जातां आई
लाडीगोडी सुरूच होई
म्यांव म्यांव करुनी गोंडा घोळता,

भोळाभाळा साधु जसा!





# कावळ्यांची शाळा



पारावरच्या झाडावर
झाडावरच्या फांदीवर

कावळे काळे होतात गोळा
भरते त्यांची तेथें शाळा!

शाळेला नाहीं खिडकी नी दार
नाहीं छप्पर, भिंती चार

वारें येतें गारीगार
पानें हलतीं हिरवीगार!

२८३५३
23/3/60

झोका आयता फांदीचा
ढग वरती चांदीचा
लपायला ढोली छानदार
चढायला शेंडा टोंकदार !



पंतोजी नाहीं शाळेला
अभ्यासाला मग टाळा
किती करावें 'काव काव'
डोकें आमुचें पिकतें राव !



अंधार पडतां गडीगुप
सगळे बसती चिडीचुप
झोंपेल तेथेंच घरदार
अशी शाळा मजेदार !

# खोकलोपंत





घराच्या कोपऱ्यांत ओटीवर
विडी ओढिती वरचेवर
घरांत चालते घर घर
धूर काढिती भक् भक्....
खोकलोपंतांची खक् खक्....





म्हातारे जमती सात-आठ
सकाळीं उन्हाला देती पाठ
कुटलेला विडा खात खात
बाता मारती ठोक् ठोक्....
खोकलोपंतांची खोक् खोक्....



देवदर्शना जाती जमुनी
बसती थोडा वेळ कीर्तनीं
बुवा रंगतां कथा-गायनीं
तबला घुमतो ताक् थोक्....
खोकलोपंतांची खोक् खोक्....

# मिठुमिया






मिठुमियां, मिठुमियां बोल ना
पायांतले चाळ वाजिवना!
विठ्ठल विठ्ठल म्हण ना !
सुरेल शीळ घाल ना !




काय तुझी ऐट, पिंजरा छान
लाल लाल चोंच कलती मान ?
पेरुची फोड किति तरि गोड !
बोल ना आतां अळिमिळी सोड



# इटुकले मिटुकले

इटुकलें मिटुकलें



पांढरें धुप्प
एका पायावर गुपचुप
डोळे झांकुन बगळेकाका
उभे राहुनी साधती मोका !

इटुकल्या मिटुकल्या




खारूबाई
यांना सदाची असते घाई
पळतां पळतां थोडी मुई
काम म्हणाल तर कांहीं नाहीं !

२८३५३
ता. ५।३।६०


इटुकलें मिटुकलें

खुडखुडराव
खमंग वस्तुवर मारती ताव
टक् टक् डोळे, रंगही काळा
अंगांत मात्र नाना कळा !




इटुकली मिटुकली

माशी मावशी
सदान् कदाची जशी उपाशीं
गोड गोड खायला धांवते कशी
चिकटुन बसते, पडते फशी !



इटुकलें मिटुकलें

ससेराव
दिसतात जसे खाशेराव
पळती धुम् दिसतां कुत्रे
असे मुलखाचे भारी भित्रे !



इटुकलें मिटुकलें सारें पिटुकलें !
लबाड, भित्रें तसें धिटुकलें !



# भातुकली

खेळामध्यें सेना रमली
भातुकलीचा खेळ चालला
लग्नाची ती गडबड घाई
निर्जिव सुंदर नटे बाहुली !





चिमाबाईचा नरवदेव अन्
किसाबाईची नवरीमुलगी
गंपू, पांडू, राधा, सिंधू
जमले गल्लींतील वऱ्हाडी !



कुणी जाहला वैदिक ब्राह्मण
कुणी जाहला ताशेवाला
कुणी जाहला मामा मोठा
कुणी लाजवी आजीबाईला

चिमाबाईचा ठसका देखा
नोकुं चिमुरडें फुरफुर करतें
किसाबाईची अदब लीनता
वरपक्षाची मर्जी धरते !





हिरव्या, काळ्या, निळ्या, जांभळ्या
बोळक्यांतुनी कोठी भरली
शेंगादाणे, गूळ कुणाचा
चुरमुरे अन् लेमन गोळी !

खेळामध्यें सेना रमली
भातुकलीचा खेळ चालला
केवळ गंमत, केवळ जंमत
चट्टामट्टा लगेच झाला !



८५९२

23/3/09